# समुद्री सस्तन प्राणी किनाऱ्यावर आल्यास काय करावे

www.marinemammals.in

**कोड: १. जिवंत २. मृत पण शरीर चांगल्या अवस्थेत ३. थोडेसे विघटित शरीर पण अवयव अखंड ४. विघटित शरीर ५. पूर्णपणे विघटित शरीर किंवा सांगाडा**

समुद्री सस्तन प्राणी किनाऱ्यावर येतो तेव्हा :



वनविभागाच्या अधिकाऱ्याला संपर्क करा
पशुवैद्यकीय अधिकाऱ्याला संपर्क करा
स्थानिक संशोधकाला संपर्क करा

**गर्दीचे व्यवस्थापन:**




गर्दी आणि किनाऱ्यावर आलेल्या प्राण्यामध्ये सुरक्षित अंतर राखा जेणेकरून त्या प्राण्याला कमी त्रास होईल त्याचप्रमाणे प्राण्याने जर अचानक कुठली हालचाल केली तर लोकांना इजा होणार नाही.

**आरोग्य आणि सुरक्षेची खबरदारी:**

१. स्वयंसेवकांनी नाक व तोंड झाकल्याची, रबराचे हातमोजे घातल्याची खात्री करुन घ्यावी आणि मगच किनाऱ्यावर आलेल्या प्राण्याजवळ जावे.
२. स्वयंसेवकांनी विघटित प्राण्याच्या शरीरासोबत जास्त काळ पाण्यात राहू नये.

## समुद्री सस्तन प्राणी मृतावस्थेत किनाऱ्यावर आल्यावर काय करावे:

समुद्री सस्तन प्राणी किनाऱ्यावर लागणे ही एक कमी खर्चिक संधी असते ज्यातून आपणांस समुद्रात असलेल्या जैविक विविधतेबद्दल माहिती मिळते, मानवनिर्मित आणि नैसर्गिक कारणांमुळे झालेल्या मृत्यूचे विश्लेषण करता येते, तसेच समुद्रात असलेल्या इतर समान जीवांच्या आरोग्याचे मूल्यांकन करता येते.

### १. छायाचित्र काढणे:






पाठ (वरून)



उजवी आणि डावी बाजू



पोट
(प्राणी लहान असल्यास )



शेपटी



डोकं आणि जबडा



पाठीवरचा पंख

प्राण्याच्या प्रजातीची माहिती मिळवण्याकरता त्याचे काढलेले फोटो निर्णायक भूमिका बजावतात.
ह्यासोबतच प्राण्याच्या संपूर्ण शरीराचा फोटो त्याच्या बाजूला फुटपट्टी किंवा एखादी वस्तू ठेवून काढावा जेणेकरून त्या प्राण्याच्या लांबीचा अंदाज येईल.

### २. मोजमाप घेणे:




किनाऱ्यावर आलेल्या डॉल्फिन किंवा देवमाशाची लांबी मोजताना सरळ रेषेत मोजावी. उदाहरणार्थ, प्राण्याच्या बाजूला सरळ रेषेत पट्टी पकडून. मोजमाप करताना मोजपट्टी शरीराच्या आकारासारखी वाकली जाणार नाही ह्याची काळजी घ्यावी. मोजपट्टी वक्राकार धरल्यास मोजण्यात आलेली लांबी ही वास्तविक लांबीपेक्षा जास्त असेल.



वरच्या किंवा खालच्या जबड्याच्या कुठल्याही एका बाजूचे दात मोजावेत. दातांचे परीक्षण केल्यास संबंधित प्राण्याचे वय, जात, खाण्याच्या सवयी आणि अनुवांवशिकतेबद्दल माहिती मिळते.

### ३. नमुना घेणे व जतन करणे:

समुद्री सस्तन प्राण्यांना भारताच्या वन्यजीव संरक्षण कायद्याच्या अधिनियम १ अंतर्गत संरक्षण देण्यात आले आहे, त्यामुळे त्यांच्या शरीरातून नमुना घेण्याअगोदर परवानगी घेतलेली असावी.
प्राण्याच्या त्वचेचा नमुना घेताना निर्जंतुकीकरण केलेल्या ब्लेड, कात्री आणि चिमट्याचा वापर करावा. त्वचेचा नमुना घेताना त्यात चरबीचा भाग येणार नाही ह्याची काळजी घ्यावी.

**त्वचेच्या नमुन्याचे परिमाण:**
१ सेमी x १ सेमी. एका प्राण्याच्या शरीरातून दोन नमुने घ्यावे.




**साठवण्याची क्रिया:**
पर्याय १ (प्राधान्य द्यावे): ७०% इथेनॉल + बर्फात गोठवणे
पर्याय २: मीठ + बर्फात गोठवणे

## समुद्री सस्तन प्राणी जिवंत अवस्थेत किनाऱ्यावर आल्यावर काय करावे:

समुद्री सस्तन प्राणी जेव्हा जिवंत अवस्थेत किनाऱ्यावर येतात तेव्हा ते प्रचंड ताणाखाली असतात. अशावेळी घटनास्थळी असलेल्या स्वयंसेवकाचं मुख्य काम कुठल्याही परिस्थितीत हा ताण कमी करणे हे असते.







किनाऱ्यावर आलेल्या प्राण्याचं थेट सूर्यप्रकाशाखाली राहून निर्जलीकरण होऊ नये म्हणून त्याला सावली द्यावी.
समुद्री सस्तन प्राण्याचे शरीर ओल्या कापडाच्या मदतीने ओले ठेवावे आणि त्यांच्या डोक्यावरील भोक झाकले जाणार नाही किंवा त्यात पाणी जाणार नाही

प्राण्याच्या बाजूला असलेल्या पंखांखालची आणि शेपटीखालची वाळू कमी करून खड्डा तयार करावा व त्यात पाणी भरावे.

### जिवंत प्राण्याला कसे हाताळावे:







ह्या प्राण्यांची शेपूट, पाठीवरचा आणि बाजूचे पंख हे नाजूक असतात, ज्यांना अगदी सहज इजा होऊ शकते.

### योग्य हाताळणी:

जर प्राणी पुन्हा समुद्रात सोडण्याइतका निरोगी असल्यास:

१.





बाजूच्या पंखांच्या मागे आणि पाठीवरच्या पंखामागे आधार देऊन प्राण्याला उचलावे.

प्राण्याला पुन्हा पाण्यात सोडण्यासाठी इच्छित स्थळापर्यंत नेण्याकरता स्ट्रेचरचा वापर करावा.

### पुन्हा समुद्रात सोडणे:

प्राण्याला पुन्हा पाण्यात सोडताना डोक्यावरील भोक आणि पाठीवरचा पंख सरळ असतील ह्याची काळजी घ्यावी. पाण्यात तरंगत्यावर प्राण्याला आरामदायक वाटण्यासाठी अलगद पुढे मागे हलवावे आणि मगच सोडून द्यावे.

२.



## मृत प्राण्याची विल्हेवाट लावणे:



### दफन करणे:

छोट्या किंवा मध्यम आकाराच्या डॉल्फिनच्या बाबतीत, त्याचे मृत शरीर भरती रेषेच्या वर नेऊन दफन करावे. भविष्यात मेलेल्या प्राण्याच्या सांगाड्याची पुनर्प्राप्ती करायची असल्यास दफन केलेल्या जागेची नोंद करावी. ब्लिचिंग पावडरसारख्या रसायनांचा वापर मृत प्राण्याच्या शरीरावर करू नये.

मजकूर: माही माणकेश्वर (mahi.mankeshwar@gmail.com), दिपानी सुतारिया
आराखडा आणि चित्र: गौरव पाटील (gauravpatilwildlife@gmail.com)
निधी स्रोत: द पॅडी (PADI) फाउंडेशन